# डॉ.व्ही.टी.पाटील यांच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सहकार क्षेत्रातील नेतृत्वाचा अभ्यास

**सुरेखा राजाराम संकपाळ** संशोधक विध्यार्थी, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रातील राजकीय, सामाजिक सुधारक व विचारवंत यांनी दिलेल्या योगदानातून व त्यांनी मांडलेल्या राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक मूल्यांची जोपासना करण्याची परंपरा सातत्याने महाराष्ट्रातील विविध प्रादेशिक क्षेत्रात व विभागात त्यांच्या अनुयायांनी, कार्यकर्त्यांनी व तत्त्वचिंतकानी चालविली आहे. त्यामध्ये व्ही.टी.पाटील यांचे बहुअंगी नेतृत्व कोल्हापूरच्या सामाजिक , राजकीय , आर्थिक क्षेत्रात १९३० ते १९७० च्या दक्षकात प्रभावी असे होते. त्यांनी लोकांना अनेक पातळीवर मार्गदर्शन करणे, त्यांचे संघटन करणे, त्यांच्यात राष्ट्रीय प्रश्नाबाबत जाणीव जागृत करून त्यांच्या सोडवणुकीसाठी लोकांचा पाठिंबा मिळविणे इत्यादी महत्वपूर्ण कामे त्यांनी केली. त्यांनी कोल्हापूर परिक्षेत्रात ५० वर्षाच्या कारकिर्दीत सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सहकार क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने कार्य केलेले आहे.

**व्ही.टी.पाटील यांचा वकील व्यवसाय व समाजातील नाव लौकिक :**

समाजाच्या सर्वच क्षेत्रात नेतृत्व अपरिहार्य मानले जाते हे खरे असले तरी राजकारण व समाजकरण हे नेतृत्वाच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचे क्षेत्र असते. कित्येक वेळा तर सामान्य लोकनेता आणि राजकारण यात फरकच करीत नाहीत. राजकारण व समाजाकरणाची नेतृत्वाभोवती झालेली गुंफण हेच याचे महत्त्वाचे कारण आहे. सामाजिक भावनिष्ठेतून नेत्याचे चारित्र्य सूचित होते. इतरांचे मतपरिवर्तन करण्याची क्षमता त्यातून त्याला मिळत असते. असे नेतृत्व व्ही.टी.पाटील यांचे होते. त्यांच्या सुरुवातीच्या काळात कोल्हापूरामध्ये वकिली व्यव्स्थायातून नाव लौकिक प्राप्त केला. त्यांना या वकिली व्यवसायातून भरपूर पैसे मिळात. त्यांनी छत्रपती राजाराम यांच्या काळात न्यायाधीश म्हणूनकाही काळ कार्य केले. कोल्हापुरात कायदेविषयक सल्ला देण्याचे कार्य डॉ.विश्वनाथ पाटील यांच्या माध्यमातून होऊ लागले यामुळे त्यांच्या बुद्धीमत्ताची प्रचिती सर्वदूर झाली.

**व्ही.टी.पाटील यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील नेतृत्व :**

डॉ. विश्वनाथ पाटील यांच्या शैक्षणिक कार्यात योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असून शिक्षणाच्या कार्यात त्यांनी दिलेल्या योगदानामुळे त्यांची खरी ख्याती कायम आहे आणि त्यासाठी कोल्हापुरातील पिढ्या पिढ्यांसाठी त्यांची आठवण होईल. त्यांना सर्वसामान्यांसाठी विशेषतः ग्रामीण जनतेच्या शिक्षण विषयक तळमळ होती. शिक्षण सर्वांना मिळण्यासाठी त्यांनी शैक्षणिक संस्था स्थापन करण्यावर भर दिला. या दृष्टीने कोल्हापूरातील भुदरगड तालुक्यात १९४६ मध्ये त्यांनी गारगोटी येथे मौनी विद्या मंदिर स्थापित केले. कालांतराने मौनी विद्यापीठ शैक्षणिक संकुलन स्थापन करून त्यांनी सर्वसामान्य जनेते प्रयत्न शिक्षण पोहचवण्याचे कार्य केले आहे. १९३८ साली छ. राजराम महाराज यांनी डॉ.व्ही.टी.पाटील यांच्याकडे महाराणी ताराबाई यांच्या बद्दल भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, पाटील जिच्या पराक्रमाची आणि कष्टाची भाकरी आज मी खातो आहे. त्या ताराराणी तिच्या पराक्रमाला अनुरूप स्मारक कोल्हापुरात व्हावे ही माझी इच्छा आहे. या कामासाठी माझे निम्मे राज्य जरी कोणी मागितले तरी मी ते त्याला अगदी आनंदाने देण्यास तयार आहे.' राजाराम महाराजांच्या अंतःकरणातील ही तळमळ आणि कृतघ्नतेची भावना पाहून डॉ.व्ही.टी.पाटील यांनी महाराजांना तसा शब्द दिला की महाराणी ताराबाई यांचे स्मारक उभे राहिले. परिणामी ताराराणी विद्यापीठाच्या रूपाने स्मारक उभे राहिले. यासाठी १९४५ साली ताराराणी विद्यामंदिराच्या रूपाने संस्थेने स्त्रीशिक्षण विषयक ध्येयपूर्तीची मुहूर्तमेढ रोवली. ताराराणी विद्यामंदिर आणि तिच्या सलग्न संस्था विस्तार वाढल्याने ताराराणी विद्यापीठ ही स्वतंत्र व स्वायत्त संस्था १९५३ मध्ये निर्माण करण्यात आली. बालभवन, प्राथमिक शाखा, उषाराजे हायस्कूल, ज्युनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन, कीर्ती कॉलेज, कुमारभव (कडगाव, ता. भुदरगड) व शिवराज कॉलेज, गडहिंग्लज अशा विविध शाखा या ताराराणी विद्यापीठा अंतर्गत कार्यरत आहेत.

**सहकार क्षेत्रातील नेतृत्व**

ल्हापुरातील सहकार चळवळीत डॉ.व्ही.टी.पाटील यांचे योगदान मोठे योगदान आहे. ते कोल्हापूरातील शेतकरी सहकारी संघाचे मुख्य संस्थापक होते आणि ते संघाच्या संचालक मंडळाचे सदस्य म्हणून मार्गदर्शक म्हणून कार्यरत राहिले. ते मराठा सहकारी बँकेच्या संस्थापक सदस्यांपैकी एक होते. कागल तालुका येथील बिद्री येथे साखर कारखाना उभारण्यातही त्यांनी पुढाकार घेतला. भुदरगड, राधानगरी आणि कागल या तीन तालुक्यासाठी एक सहकारी साखर कारखाना उभा करण्यासाठी संकल्प केला गेला. त्याला विश्वानाथ पाटील यांनी आपल्या नेतृत्व शैलीने पूर्ण करू घेतले. त्यांनी त्यांनी

कारखान्याच्या उभारणी लागणार विलंब या बाबत लोकांची मने वळविली, गैरसमज दूर केले. व कारखाना उभारणीची चिकाटी सोडली नाही आणी कारखाना उभा केला . तसेच वेदगंगा सहकारी साखर कारखाना स्थापन करण्यासाठी आंदोलन केले. १९६२ मध्ये त्यांनी ताराराणी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांसाठी वैश्वनाथ सहकारी गृहनिर्माण संस्था सुरू केली आणि पूर्ण केली. कोल्हापूरातील शाहू मार्केट यार्डचे संस्थापक सदस्यांपैकी एक होते. ते बरीच वर्षे मार्केट कमिटीचे अध्यक्ष होते. त्यांनीच शाहू बाजाराची उभारणी केली. यासर्व संस्था स्थापन करताना काकांनी कोणताही राजकीय हेतू न ठेवता सामाजिक कार्यासाठी काम केले. म्हणूनच त्यांनी कधीही या संस्था नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला नाही.

**राजकीय क्षेत्रातील नेतृत्व :**

१९३० पासून कोल्हापुरात क्षेत्रातील राजकीय क्षेत्रात डॉ.विश्वनाथ पाटील यांनी प्रवेश केला. कोल्हापूर नगरपालिका, जिल्हा स्कूल बोर्ड, इलाखा पंचायत, बालवीर चळवळ इत्यादी क्षेत्रात मी प्रत्यक्ष भाग घेऊ लागले. पहिल्या प्रथमच रयत सभेच्या कारणावरून त्यांचा राजकारणाशी संबध आला. १९३० मध्ये त्यांना नगरपरिषदेचे सभासद म्हणून नामांकन मिळाले आणि तीन वर्षांच्या आत त्यांनी तेथे आपली प्रतिष्ठा वाढविली आणि १९३३ ते १९३९ पर्यंत मध्ये कोल्हापूर नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून काम केले. १९३९ ते १९४८ पर्यंत कोल्हापूर स्थानिक मंडळाचे अध्यक्ष कार्य केले. १९४२ ते १९४५ पर्यंत ते कोल्हापूर राज्य विधानसभेचे सदस्यही होते. १९५२ च्या निवडणुकीत ते भुदरगड-आजरा मतदारसंघातून मुंबई विधानसभेवर निवडून गेले आणि १९५७ ते १९६२ पर्यंत ते कोल्हापूर मतदारसंघातून भारतीय संसदेचे सदस्य म्हणून निवडून गेले. त्यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीच्या या सर्व वर्षांमध्ये जनतेसाठी अतुलनीय सेवा दिली आहे.

**सारांश :**

डॉ.विश्वनाथ पाटील हे कोल्हापूरात सामाजिक समानता आणि न्याय या आदर्श परंपरेत वाढले असून शाहूंचे खरे अनुयायी होते. शिवाय उच्चशिक्षित होते. म्हणूनच, त्यांनी शैक्षणिक संस्थांमधून जातीयवादी आणि इतर धार्मिक गोष्टी ठेवल्या नाहीत असे दिसते. डॉ.विश्वनाथ पाटील हे जातीने मराठा असूनही ते म्हणायचे की त्यांची जात एक अपघात आहे परंतु त्यांच्या शैक्षणिक संस्थेत कोणतीही जात नाही. संस्थापकांची जात शैक्षणिक संस्थेशी जोडणे चुकीचे आहे. शिक्षण देणे हे शैक्षणिक संस्थेचे ध्येय आहे. तसेच त्यांनी भुदरगड तालुक्यातील उपेक्षित खेडूतांसाठी त्यांनी श्री.मौनी विद्यापीठ उभे केले. बहुजन समाजातील उपेक्षित स्त्रीला न्याय देण्यासाठी ताराराणी विद्यापीठाची स्थापना केली. ५५ वर्षाहून अधिक काळ या दोन्ही कार्यांना अव्यभीचारी निष्ठा दिली. ही कामे उभी करण्यात त्यांनी स्वतःचे तन-मन-धन खर्च करून टाकले. त्यांच्या या कार्यातून त्यांचे विविध नेतृत्वाचे पैलू दिसून येतात. ज्यामध्ये सामाजिक कार्यातील नेतृत्व करताना त्यांच्या निर्णय क्षमतेत समाजाच्या हिताचा विचार होता. शैक्षणिक कार्यातील नेतृत्वात त्यांनी कधीही गुणवत्ते बाबत तडजोड केली नाही. राजकीय कार्यातील नेतृत्वामध्ये राजकीय निर्णयात समाजाच्या हिताचा विचार केला तसेच लोकसेवक ही भावना नेहमी अंगी बाळगली. यापध्दतिने त्यांच्या जीवनप्रवासामध्ये नेतृत्वाचे बहुआयामी गुण दिसून येतात. त्याचे नेतृत्व विकासाचे प्रारूप स्पष्ट करत असल्याचे दिसते.

संदर्भसूची :

१. Kolhapur state Administrative Reports- for the years:- 1930-31 to 1945-46.
२. Articles Written by Dr. V.T. Patil :- Address given by him as a chairman of reception committee on the occasion of the conference the directors of the association of Maharashtra private educational institution, date. 30 March 1980
३. खेकाळे ना. रा., "राजकीय नेतृत्व", श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९९
४. गिंडे व्ही.पी., "श्री.व्ही.टी.पाटील यांचे जीवन कार्य परीच्या, ताराराणी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर
५. पाटील जे.ए., "भावसुंगध" ताराराणी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर,१९७४. पाटील डी.डी., "शिक्षण महर्षी विश्वनाथ तुकाराम पाटील" ताराराणी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर,२००३